प्रकरण पाचवे

# 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यांचे सामाजिक व वाङ्मयीन मूल्यमापन

५.१ प्रास्ताविक

५.२ 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यांचे सामाजिक मूल्यमापन

* समाजदर्शन
* दलित-सवर्ण जातींतर्गत श्रेष्ठ-कनिष्ठतेचे चित्रण
* सवर्ण समाजातील अंधश्रद्धा, रूढी - परंपरा
* आंबेडकरी विचारांचा आविष्कार
* दलितांच्या कौटुंबिक जिव्हाळ्याचे चित्रण
* विद्रोहाचे प्रकटीकरण
* दलितांच्या दु:ख दारिद्र्याचे, वस्तीचे चित्रण
* दलित - सवर्ण संघर्ष

५.३ वाङ्मयीन मूल्यमापन

* शीर्षकाची प्रतिकात्मकता
* शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्यांच्या अर्पणपत्रिका
* निवेदन पद्धती
* संवाद
* भाषाशैली
* वातावरण निर्मिती
* वाक्प्रचारांचा वापर
* इंग्रजी शब्दांचा वापर
* लेखकाची तटस्थ वृत्ती
* निष्कर्ष
* संदर्भसूची

प्रकरण ५ वे

# 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यांचे सामाजिक व वाङ्मयीन मूल्यमापन

## ५.१ प्रास्ताविक :

कादंबरी हा वाङ्मयीन घटक साहित्य आणि समाज या दोहोंशी संबंधीत असल्याने कादंबरी हा बहुआयामी व सामाजिक आशयद्रव्य लाभलेला वाङ्मयप्रकार आहे. त्यामुळे एखाद्या कादंबरीतील जीवनचित्रण प्रत्ययी आहे, की नाही हे व्यक्तिचित्रण आणि समाज चित्रणावरून दिसून येते. सामाजिक वास्तव हे कादंबरीचे प्रमुख अंग असल्याने कादंबरी या वाङ्मयप्रकाराची पाळेमुळे समाजव्यवस्थेतच रूजलेली असतात. साहित्य आणि समाज यांचे अतुट नाते असते म्हणूनच साहित्य म्हणजे समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. म्हणूनच साहित्याचा सामाजिक व वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास केला पाहिजे.

एखाद्या समाजाचे सर्वांगीण दर्शन लेखक वाचकांना आपल्या साहित्यातून घडवीत असतो. ज्या कादंबऱ्यामध्ये सामाजिकता प्रकर्षाने जाणवते त्यांना आपण सामाजिक कादंबरी म्हणतो. प्रा. वसंत डोळस दलित कादंबरीविषयी असे म्हणतात की, 'दलित कादंबरी दलित समूह जीवनाचे व सामाजिक बांधीलकीचे तत्व जपताना दिसते.[१] म्हणजेच सामाजिकता हेच दलित कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य आढळते. मुलत:च दलित कादंबरीकार सामाजिक बांधीलकी मानणारे असतात. या समाजाच्या भीषण अवस्थेचे, दारिद्र्याचे, अज्ञानाचे, माणूसकीला पारख्या झालेल्या आपल्याच बांधवाचे दु:ख त्यांनी जवळून पाहिले असल्याने दलित कादंबरीतील आशयाचा एक महत्वाचा पैलू म्हणजे या कादंबऱ्यांना प्राप्त झालेले आंबेडकरी विचारांचे अधिष्ठान होय. सभोवतालच्या परिचित विश्वाचे वास्तव चित्रण या कादंबरीतून येत असल्याने कादंबरीची भाषा आशयाशी एकरूप झालेली दिसून येते.

ज्या समाजाचे चित्रण कादंबरीकार करतो त्या समाजाची स्पंदने तो लक्षात घेतो, कारण तो समाजाचा जबाबदार घटक असतो. सामाजिकता हेच दलित कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. दलित कादंबरीला सामाजिक व राजकीय आशय लाभलेला असल्याने या कादंबरीच्या समीक्षेसाठी समाजशास्त्रीय समीक्षेच्या कसोट्या वापरून तिचे मूल्यमापन केले जाते. या कादंबरीतील संज्ञा संकल्पना कोशात सामाजिक कादंबरीच्या समीक्षेबद्दल म.द. हातकणंगलेकर पुढीलप्रमाणे आपले मत मांडतात, "सामाजिक कादंबरीचे मूल्यमापन करताना ती कादंबरी समाजाच्या गतिशील परिवर्तनाचे बदलत्या काळाचे, काळानुसार बदलणाऱ्या मानवी वृत्ती-प्रवृत्तीचे आणि मूल्यव्यवस्थेचे चित्रण करते की नाही हे पाहणे म्हणजेच सामाजिक कादंबरीची योग्य समीक्षा करणे होय."[२] कादंबरीत गतिशील समाजाचे भान लेखकाने ठरवलेले असल्याने सामाजातील परिवर्तनाबरोबरच मानवीप्रवृत्ती मध्ये झालेल्या बदलाचे चित्रण कादंबरीकार कादंबरीत करतो. शरणकुमार लिंबाळे यांच्या 'उपल्या' व 'हिंदू' या दोन कादंबऱ्याना सामाजिक, राजकीय, धार्मिक परिप्रेश्य लाभलेला आहे.

## ५.२ 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यांचे सामाजिक मूल्यमापन

दलित कादंबरी सामाजिक आशयाच्या वातावरणातून वास्तवतेची पार्श्वभूमी घेऊन अवतरत असल्याने 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यांचे सामाजिक मूल्यमापन करताना कादंबरीतील समाजदर्शन, जातीव्यवस्था व अस्पृश्यतेमुळे प्राप्त होणारे दुःख, आंबेडकरी विचारांचा आविष्कार, सवर्ण समाजातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, दलितांच्या कौटुंबिक जिव्हाळ्याचे चित्रण, विद्रोहाचे प्रकटीकरण, याबरोबरच दलित - सवर्ण संघर्ष या घटकांचा विचार केला आहे.

### समाजदर्शन :

कोणतीही कादंबरी एका अर्थाने सामाजिक असल्यानेच त्या कादंबरीतून समाजदर्शन घडत असतानाच संबंधीत अशा आशयसूत्राला ती कादंबरी स्पर्श करत जाते. 'उपल्या' व

'हिंदू' या कादंबऱ्यांचा विचार करता वास्तववादी आशयसूत्र, परिवर्तनवादी आशयसूत्राबरोबरच राजकीय आशय या कादंबऱ्यातून येतो. शरणकुमार लिंबाळेंच्या 'उपल्या' या कादंबरीत समाजदर्शन तर घडतेच पण निश्चित असा कालखंडही येतो. सन १९५६ ते १९९६ या चार दशकातल्या काळावर आधारित ही कादंबरी आकारास येते. विदर्भातील विविध ठिकाणांच्या संदर्भासहित 'उपल्या' कादंबरी अवतरते. जीवनात सहज अवतरावीत अशी पात्रे त्यांच्या दोन्ही कादंबरीत येतात. विशेषकरून या कादंबऱ्यांमध्ये दलित – सवर्ण संघर्षाबरोबर दलित चळवळीवर प्रकाश टाकलेला आहे.

'उपल्या' कादंबरी दलित चळवळीवर प्रकाश टाकणारी असल्याने तिच्या परिवर्तनशील गतीवर लक्ष दिलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीत उलथापालथ झाल्याने दलित नेत्यामध्ये मोठ्या प्रमाणात मतलबाची स्वार्थी भावना निर्माण झाली. जनतेच्या पाठिंब्याशिवाय कोणतीही चळवळ उभी राहू शकत नाही, यासाठी अनेक नवीन योजना अंमलात येऊ लागल्या. कोणाला समाजवादी ठरवून तर कोणाला हिंदुत्ववादी ठरवून समाजापासून वेगळे पाडण्याचे राजकारण सुरू झाल्याने खरा वर्गशत्रू आणि वर्णशत्रू बाजूला राहिल्याने दलितांतर्गत दुही माजली. मी आणि फक्त मीच खरा नेता, माझ्यासारखा माझ्यानंतर कुणी कधीच नको अशी मानसिकता दलित चळवळीतील कार्यकर्त्यांची निर्माण झाल्याने चळवळी मोडीत निघाल्याने समाजही गटागटात विभागला गेला.

एकेकाळी चळवळीत एकत्र काम करणारे कार्यकर्ते चळवळीत फूट पडल्याने राजकीय विरोधक म्हणून राजकारणात सहभागी होतात. हेच कार्यकर्ते राजकीय नेते झाले की पूर्णपणे बदलतात व भ्रष्टाचारी होऊन राजकीय बाहुले बनतात. आपला समाज सुधारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या योजना राबविण्यासाठी ते कोणतेच निर्णय घेऊ शकत नाहीत, शिवाय राजकीय यंत्रणेखाली दबले जाऊन समाजकल्याणमंत्री असूनसुद्धा आपल्या समाजाचा कोणताही विकास करत नाहीत. उलट हे नेते आपल्याच समाजबांधवांचा रोष

पत्करणारे व आश्वासन देणारे मंत्री बनून राहतात. लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी १९५६ ते १९९६ या चार दशकातील इतिहास 'उपल्या' या कादंबरीतून मांडल्याने दलित चळवळीच्या नेत्यांना ते वास्तवाचे भान करून देतात.

हिंदू धर्म आणि सामाजिक विषमतेचा चेहरा धारण करणारी 'हिंदू' ही कादंबरी समाजातील विषम ताणेबाणे आणि विकृत जातीव्यवस्थेची चिरफाड करणारी आहे. या कादंबरीत दलितांचे दु:ख, दलितांच्या व्यथा आणि सवर्णीयांकडून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे चित्रण येते. गावकुसाबाहेर असणाऱ्या लोकांच्या प्रगतीमध्ये गावातील सवर्णीय लोक अडथळे आणून दलित जागृतीचा आणि ऐक्याचा बळी घेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावीत झालेले अनेक दलित कार्यकर्ते दलित चळवळीत भाग घेऊन आपल्या बांधवांना आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची जाणीव करून देतात. त्यासाठी तात्या कांबळे हा दलित नेता घरची पूर्वपरंपरागत चालत आलेली तमासगिरी सोडून 'आंबेडकरी जलशाद्वारे' आपल्या समाज बांधवांना डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या मूलमंत्राची जाणीव करुन देतो. किड्यामुंगीसारखे क्षुद्र जीवन जगण्यापेक्षा सवर्णांची गावकीची कामे नाकारुन आत्मसन्मानाने जगण्याची शिकवण जलशाद्वारे करुन देतो. त्याच्या गावात होणाऱ्या जलशामुळे सवर्णीयांच्या मनामध्ये त्याच्याविषयी असंतोष निर्माण होतो. ''दलितांनी आमची सेवाचाकरी करावी आम्ही देईल ते घेऊन धन्य मानावं.''[३] अशी सवर्णांची भूमिका होती. पण दलितांनी या व्यवस्थेला नाकारले होते. तात्या कांबळेच्या जलशामुळे गावातले वातावरण ढवळले होते. गावातील सवर्णीय लोक तात्या कांबळेवर कोणत्या ना कोणत्या कारणाने चिडले होते. ''आंबेडकरांचा पुरस्कार करणाऱ्या महारांना वेगळं पाडलं पाहिजे.''[४] अशी सवर्णांची भावना झाल्याने त्यांनी प्रथम तात्या कांबळेच्या खून करुन 'जलसाकार तात्या कांबळेचा गाव' ही ओळख कायमची पुसून टाकली होती. नाव असलेल्या आणि दलितांचा नेता असलेल्या व्यक्तिचा खून करुन सर्वसामान्य दलितांना धडा शिकवण्याचा सवर्णीयांचा हा

प्रयत्न होता. या घटनेने दलित-सवर्ण संघर्ष वाढीस लागतो. याचा फायदा सवर्ण लोक घेऊन दलितामध्येच फूट पाडतात व स्वत:चा स्वार्थ साधून घेतात.

### * दलित – सवर्ण जातींतर्गत श्रेष्ठकनिष्ठतेचे चित्रण :

देशाला स्वातंत्र्य मिळून आज ५० वर्षे झाले तरी समाजात तीव्र स्वरूपाचा जातीभेद आढळून येतो. माणूस जन्माला आल्यापासूनच त्याला जात चिकटते म्हणूनच जात नाही ती जात असे म्हटले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या मंत्राने भारावलेले अनेक दलित तरुण शिक्षण घेऊन नोकऱ्या करू लागले पण त्यांना लागलेला जातीयतेचा कलंक ते कधीही नष्ट करु शकले नाहीत. सवर्णीय लोक वरकरणी सुशिक्षिततेचा व समानतेचा आव आणत असले तरी त्यांच्या मनातील जातीयता कधीच नष्ट होत नव्हती. 'उपल्या' कादंबरीतील अनिरुद्ध हा याच मानसिकतेचा शिकार झालेला आहे. तो ब्राम्हण असल्यामुळे स्वत: आपल्या खोलीत राहणाऱ्या दलित मित्रांना तुच्छतेची व हिनतेची वागणूक देतो. त्यांना नेहमी कमी लेखतो. यामुळे स्वत: अस्पृश्य असल्याचे दु:ख रोहिदास, मिलिंद, पंडित कानडे यासारख्या पँथरमध्ये काम करणाऱ्या अनेक तरुणांना होते. जन्माने अस्पृश्य असल्यामुळे त्यांनी अस्पृश्यतेचे चटके सहन केलेले असतात. म्हणूनच ते 'दलित पँथर संघटना' स्थापन करुन अस्पृश्यतेविरुद्ध लढा पुकारून आजपर्यंत सहन केलेल्या अन्याय अत्याचाराचा बदला घेतात.

### * सवर्ण समाजातील अंधश्रद्धा, रूढी – परंपरा :

दलित समाजाबरोबर सवर्ण, समाजही अंधश्रद्धा रूढी परंपरांना बळी पडलेला आहे. परंपरागत चालत आलेली अस्पृश्यता, अज्ञान, दारिद्र्य याबरोबरच सवर्ण समाजातील चालीरीतीवरही शरणकुमार लिंबाळे यांनी प्रकाश टाकलेला आहे. ब्राह्मण समाजातील मुलगी भावना ही विधवा होते याचे खापर तिच्याच माथी मारले जाते. घरातील वृद्ध स्त्रिया भावनाला दोष देतात. ''तुम्ही तुमच्या मुलीची खोटी पत्रिका दाखवलीत फसवलतं आम्हाला.''[५] असा आरोप भावनाच्या वडीलांवर करतात. नवरा वारल्यानंतर त्या

स्त्रीचे केशवपन करण्याची पद्धत ब्राम्हण समाजात आहे. म्हणजेच दलित समाजाप्रमाणे मध्यमवर्गीय ब्राम्हणसमाज सुद्धा अंधश्रद्धा रूढी परंपरेचा बळी ठरलेला दिसून येतो.

## * आंबेडकरी विचारांचा आविष्कार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही दलित समाजाची युगसापेक्ष प्रत्यक्ष मूळ प्रेरणा असल्याने आत्मविकासाची डोळस जाणीव दलित समाजाला झाली. डॉ. आंबेडकरांनी माणसाचे स्वातंत्र्य, माणसा-माणसांमधील समता आणि बंधूभाव यांना महत्व दिले. याचाच परिपाक म्हणून आज दलित समाजातील हजारो तरुण शिक्षित होऊन आंबेडकरी विचारांचा आविष्कार करताना दिसतात. लेखक शरणकुमार लिंबाळे यांच्या 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यातून त्यांनी दलित चळवळीवर प्रकाश टाकलेला दिसून येतो. 'उपल्या' कादंबरीत दलित तरुण विद्यार्थीदशेपासूनच अनेक संघटना स्थापन करुन संघटनेमार्फत अनेक अत्याचारी, अन्यायी लोकांचे प्रश्न सोडवितात. याकामी ते स्वत:ची जराही पर्वा न करता प्रसंगी तुरुंगवासही भोगतात. 'दलित पँथरची' एकच मोठी संघटना स्थापन करुन दलितांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. दलित समाजाला आंबेडकरी विचाराने प्रभावीत करुन या आंदोलनात दलितांनाही सहभागी करुन घेतात. यामुळे स्वत:च्या संकटासाठी स्वत: उभे राहण्याची ताकद दलित समाजात निर्माण होते. सवर्णांनी स्वत:वर केलेल्या अन्यायाची जाणीव झाल्यामुळे दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारुन गावकीची कामे नाकारली. या कारणाने चिडून सवर्णांनी दलितांवर सामाजिक बहिष्कार टाकला होता. याचाच बदला घेण्यासाठी दलितांनीही महापालिकेच्या निवडणूकीवर बहिष्कार टाकून राजकीय समीरकण बदलून टाकले आणि सवर्णांना लाचार बनविले.

'हिंदू' कादंबरीमधील आंबेडकरी विचाराने भारावलेला तात्या कांबळे हा दलित नेता गावकीची कामे नाकारुन स्वत: बौद्ध धर्म स्वीकारुन दलित समाजापुढे आदर्श निर्माण करतो. त्यांच्या घरात गाणे पिढीजाद असल्याने तमाशा हाच त्याच्या घराचा वंशवृक्ष होता. पण तात्या कांबळेने हा वसा नव्या रूपात चालवला होता. तमाशा करुन छंदीफंदी लोकांची

करमणूक करण्यापेक्षा आपल्या समाजातील अज्ञानी अंध:कारात चाचपडणाऱ्या समाज बांधवांना जागृत करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. तमाशाऐवजी आंबेडकरी जलशाद्वारे गावोगावी जलशाचे अनेक प्रयोग करुन आजच्या समजाव्यवस्थेची जाणीव दलित समाजाला करुन दिली. आंबेडकरी विचारांचे महत्व पटवून सांगितले. बौद्ध धर्म स्वीकारुन गावकीची कामे नाकारण्यास प्रेरित केले. शरणकुमार लिंबाळे यांच्या व्यक्तित्वातच कार्यकर्ता आणि लेखक असा मेळ असल्याने त्याच्या खूणा या कादंबऱ्यातून आढळून येतात.

## * दलितांच्या कौटुंबिक जिव्हाळ्याचे चित्रण :

जन्मल्यापासून दु:ख, दैन्य, गरीबी, लाचारी, अपमान हेच ज्यांच्या जीवनाचे समीकरण होते अशा दलितांच्या जीवनात काही प्रेमाचे, ममतेचे, सुखाचे, आनंदाचे क्षणही येतात. दलित कादंबरीत दलितांच्या कौटुंबिक जिव्हाळ्याचे आढळणारे चित्र म्हणजे त्यांचे सौंदर्यस्थळच म्हणावे लागेल.

'उपल्या' या कादंबरीतील 'दयानंद किणीकर या दलित तरुणाची घरची परिस्थिती अत्यंत बिकट होती. पोटाची खळगी भरण्यासाठी गावाशेजारी असणाऱ्या म्हसोबाच्या देवळात मिळणाऱ्या पैशातच गुजराण करावी लागत असल्याने एके दिवशी रस्ता ओलांडत असताना वडीलांचा मृत्यू होतो. त्याच्यावरील पितृछत्र हरपल्याने दयानंदला वस्तीगृहात ठेवले जाते. गावी आई एकटीच राहते, पण काही दिवसानी तीही एका ट्रक ड्रायव्हरबरोबर पळून जाते. या घटनेनंतर दयानंद एकटा पडल्याने त्याचा सांभाळ नाजुका मावशी आईच्या मायेने करते. त्याला पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळून त्याच्या सर्व इच्छाआकांक्षा पूर्ण करते. दयानंद शिकून नोकरीस लागतो. विधवा ब्राम्हण मुलगी भावना हिच्याशी लग्न करुन नवीन संसाराला सुरुवात करतो. सुरुवातीला नाजुका मावशी या कारणाने नाराज असते पण तिला दोघे भेटायला गेल्यावर भावना तिच्या घरी सर्व काम करते. तिच्याशी मायेने बोलते. त्यामुळे मावशीची नाराजीही हळूहळू कमी होते. काही दिवसानी मावशी दयानंद व भावनाला भेटायला येते तेव्हा गाठोड्यातून सागुतीचे गाडगे बांधून आणते. दयानंदने मावशीला

गाठोड्यातून काय आणले हे विचारताच ती म्हणते, ''बामनाची बायको केलीस. तुला सागुती खायला कुठून मिळणार ? ही बामनीन तुला काय करुन घालील ? दोन दिवस राहीन तुला खाऊ घालीन आणि जाईन. तू माझ्या स्वप्नात येऊन मटण मागत हुतास म्हणून आले.''[६] या नाजुका मावशीच्या काळजीवरून दलित कुटुंबात कितीही दारिद्र्य असले तरी जिव्हाळा आणि मायेत बद्ध असलेली माणसे दिसून येतात.

'हिंदू' कादंबरीतील तात्या कांबळेचा लहान भाऊ सदानंद हा लहान असतानाच त्यांच्यावरील मायेचे छत्र हरपल्याने सदानंदची पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्यावर पडते. तात्या कांबळे आणि त्याची पत्नी सविता सदानंदला मुलासारखं वाढवतात. पण हाच सदानंद आपल्या भावाचा खून झाल्यावर सरपंचपद मिळवण्याच्या स्वार्थापायी सदानंद खून्यांच्या बाजूने साक्ष देऊन सरपंचपदापासून मंत्रीपदापर्यंत मजल मारतो. मंत्री पदाची शपथ घेतल्यांनतर आपल्या अचलपूर या गावी भेट देण्यास येतो. तो जेव्हा आपल्या वहिनीचा आशीर्वाद घ्यायला दलित समाजात जातो तेव्हा तिच्या मनात सदानंदविषयी कोणताच राग नसतो. सदानंद मंत्री झाला हे कळताच तिचे डोळे आंनदाश्रूने भरून येतात. एवढा मोठा गुन्हा करुनही ती सदानंदला माफ करून राजकीय वाटचालीत यशस्वी होण्याचा आशीर्वाद देते कारण स्वत:च्या मुलासारखा त्याचा सांभाळ सविताने केलेला असतो. अशाप्रकारे दलित कुटुंबातील जिव्हाळ्याचे चित्रण शरणकुमार लिंबाळे 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबरीतून घडवतात.

## * विद्रोहाचे प्रकटीकरण :

गावगाड्यामध्ये जीवन जगत असताना दलितांच्या वाट्याला केवळ अपमान, छळ, अन्याय, अत्याचार आणि पिळवणूक लेखक शरणकुमार लिंबाळेंनी अनुभवली व पाहिली असल्याने त्यांच्या कादंबऱ्यातून विद्रोहाची जाणीव प्रकटतेने दिसून येते. 'उपल्या' कादंबरीतून पांगरी गावातील सवर्णांच्या प्रवृत्तीविरुद्ध व्यक्त झालेला विद्रोह दिसून येतो.

पांगरी गावातील दलित समाजाने बौद्ध धर्म स्वीकारल्याने त्यांनी गावकीची कामे नाकारली होती. काम करणारा महार नसेल तर त्याची बायको किंवा मुलगा काम करत असत. पण आज सर्वांनीच गावकीची कामे नाकारली होती. हिंदूच्या देवदेवता व हिंदूधर्मही नाकारल्याने गाव अडचणीत आला होता. 'गाव बंद तर गावकी बंद'[७] अशी गावकऱ्यांनी भूमिका घेऊन गावपंचायतीने हा निर्णय एकमुखाने घेतला होता. दलितांना आपली चूक समजण्यासाठी सवर्णांनी दलितांवर बहिष्कार टाकला. गाववाल्यांनी रोज नव्या पद्धतीने छळ मांडला होता. सवर्णांनी दलितांच्या पाणी पिण्याच्या विहीरीत मेलेले कुत्रे टाकले होते. दलितांनी पहाटेच पाणी भरले होते व दलित लोक सकाळीच दुसऱ्या गावात मोलमजुरीसाठी गेले होते. तेलामीठासाठीही दलितांना परगावी जावे लागे. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी दलितांनी गावाविरुद्ध संघर्ष करण्याच ठरविले होते, ही वर्तमानपत्रातील बातमी वाचून दलित संघटनेतील कार्यकर्ते पांगरी गावच्या दलितांच्या मदतीला धावून आले. गावातील सवर्णाच्या घराघरांना गराडा घालून दिसेल त्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. गावकुसाने सवर्णसमाजाचा हजारो वर्षात प्रथमच आक्रोश ऐकला व पाहिला होता. प्रचलित समाजव्यवस्थेविरुद्ध दलितांनी केलेला विद्रोह या कादंबरीतून प्रकट होते.

## * दलितांच्या दु:ख, दारिद्र्याचे, वस्तीचे चित्रण :

प्रचलित समाजव्यवस्थेतील गावगाडा आणि त्यांचे संस्कार प्रभावीपणे आजही दलित समाजात कार्यरत असल्याचे दिसून येतात. विशेषत: बलुतेदारी पद्धतीचे जीवन जगणाऱ्या महार, मांग, ढोर, चांभार या लोकांच्या समाजाची स्थीति फारच हलाखीची आहे. गावपांढरीतल्या दलित समाजाची परवड 'हिंदू' व 'उपल्या' या दोन कादंबऱ्यामध्ये शब्दबद्ध केली आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातसुद्धा दलितांना अनेक कष्टाची व गावकीची कामे करुनच जीवन जगावे लागते. 'उपल्या' या कादंबरीमध्ये पांगरी गावातील दलितांनी गावकीची सर्व कामे नाकारून बौद्धधर्म स्वीकारल्याने गावातील

सवर्णांनी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकून अनेकप्रकारे दलितांचा छळ चालवला होता. गावकीची कामे नाकारल्याने त्यांना तेलामीठासाठी सुद्धा दुसऱ्या गावात जावे लागे. कोणी भीकही वाढत नव्हते. कोणी भीक वाढलीच तर गावगुंड त्याच्या घरी जाऊन दम देत असत. सवर्णांनी दलितांना जीवन जगणे नकोसे केले होते. यावरून दलितांवर होणाऱ्या अन्यायाची प्रखर जाणीव होते.

'हिंदू' या कादंबरीतून लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी दलित वस्तीचे व त्यांच्या दु:ख दारिद्र्याचे केलेले वर्णन मनाला चटका लावून जाते.स्वतंत्र भारतात आजसुद्धा दलित समाजातील महार, मांग, चांभार इत्यादी जातींचे दारिद्र्य अजूनही नष्ट झालेले नाही. दारिद्र्य, उपासमार, मानहानी, परावलंबित्व यांच्याशी झगडा करूनच आजही या समाजाला जगावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर करून बहुजन वर्गाचा दर्जा सुधारण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या सर्व मिळण्याचे स्वातंत्र्य बहुजन समाजाला दिले. तरीही मांग समाज त्यापासून काहीसा वंचित राहिल्याचे दिसून येते. कितीही सोयी सवलती मिळाल्या तरी या समाजाच्या वाट्याला आलेले दारिद्र्य, भूक, शोषण, मुस्कटदाबी, मारहाण याचे वास्तववादी दर्शन लिंबाळे या कादंबरीतून घडवितात.

मातंग समाजातील लहू मांग पोटासाठी जीव मुठीत धरून 'जाग रहा ऽऽ'[८] अशी गस्तीची आरोळी देत असे व सकाळी येसकराची भाकरी मागायला जात असे. त्याची बायको द्रौपदी दररोज सकाळी सर्व गाव झाडायला जाई यामुळे त्यांच्या दोनवेळच्या जेवणाची भ्रांत मिटत असे. रस्ता झाडत असताना विष्णु पुजारी प्रसाद देण्याच्या बहाणा करुन तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो पण पोटासाठी ती आपले चारित्र्य पणाला लावत नाही. विष्णु पुजाऱ्याच्या हाताला ओरखाडून ती स्वत:ची सुटका करुन घेते. आपलं कर्तृत्व ती गाववाल्यांना सांगेल व आपली नाचक्की होईल या कारणाने चिडून विष्णु पुजारीने द्रौपदीविषयी गावकऱ्यांच्या मनात द्वेषाची भावना निर्माण केल्याने गावकऱ्यांनी तिची गावातून नग्न धिंड काढली. महाभारतातसुद्धा द्रौपदी विवस्त्र झाली नव्हती पण स्वतंत्र

भारतात द्रौपदी विवस्त्र झाली होती कारण ती दलित होती. द्रौपदीच्या रूपाने दलित समाजातील स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा पट उलगडण्याचा प्रयत्न लिंबाळेंनी केला आहे.

आयुष्य म्हणजे भूक, पोटाची आग, हालाखीचे जगणे, आणि गरिबी मान, सन्मान, प्रतिष्ठा यापासून जन्मत:च वेगळा राहिलेल्या दलित समाजातील लोकांना जरी नवी घरे मिळाली तरी जगण्यासाठी त्यांना गावावरच अवलंबून रहावे लागते. त्यासाठी त्यांना गाववाल्यांच्या विनवण्या कराव्या लागतात. 'हिंदू' कादंबरीतील दलित वस्तीचे चित्रण लिंबाळे वास्तवतेने प्रकट करतात. दलित समाजातील अंबादास आपला दारुचा धंदा नव्याने सुरू करुन आपला चरितार्थ चालवतो, तर नामदेव आभरान घालून भीक मागायला जातो. सिद्धार्थ पगारेची बहीण घरी कोंबड्या पाळून आपला खर्च भागवत असते. समाजातील लहान मुलांपेक्षा कुत्र्यांचीच संख्या अधिक होती. नवीन घरांच्या भिंती धुराने काळवंडल्या होत्या. काही घरांचे कडीकोयंडे तर काही घरांच्या खिडक्या तुटल्या होत्या. त्या परत नव्याने दुरुस्त करण्यास त्यांच्याकडे पैसे नसल्याने नवीन वस्तीला झोपडपट्टीचा चेहरा मिळत होता. शरणकुमार लिंबाळेंनी केलेले दलित वस्तीचे व त्यांच्या जगण्याच्या पद्धतीचे वर्णन वास्तव व प्रलयकारी वाटते. धर्म बदलला, उपासनापद्धती बदलली तरी रोजीरोटीचे प्रश्न बदलत नाहीत.

### * दलित – सवर्ण संघर्ष :

भारतीय समाज व्यवस्था सामाजिक व आर्थिक विषमतेवर आधारित असल्याने सामान्य माणसाच्या जीवनातील स्थैर्य नष्ट झाले आहे. समाजात असावी लागणारी सहानुभूती एकता व बंधुतेच्या आभावी व्यक्तिविकास आणि राष्ट्रीय प्रगतीला पोषक असणारे वातावरणच संपुष्टात आले आहे. जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था, समाजव्यवस्था या ओझ्याखाली दबला गेलेला अशिक्षित दलित समाज होरपळून निघाला आहे. म्हणून हा

समाज धर्माच्या जातीच्या नावाने वागणाऱ्या प्रतिगामी शक्तींचा विरोधक दिसून येतो. 'उपल्या व हिंदू' कादंबरीतील संघर्ष हा दलित – सवर्ण जातीतील संघर्षावर प्रकाश टाकते.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी दलित समाजाने नामांतर आंदोलन सुरु केले. नामांतराच एक निमित्त घडले आणि हजारो वर्षांची सनातन संस्कृती आणि दलितांचा स्वाभिमान यांचे परिवर्तन संघर्षात झाले. या संघर्षाने जास्त हानी झाली ती दलित समाजाची. या संघर्षाने अनेक दलितांच्या झोपड्या जाळून त्यांना बेघर बनविले. दंगलीत अनेक दलित तरुण मारले गेल्याने घरातील आशेचे किरण नाहीसे झाले. 'उपल्या' कादंबरीतील सुगाव हे आदर्श गाव म्हणून ओळखले जाते. तिथे साक्षरता प्रसार दारुबंदी इ. कार्यक्रम सवर्ण – दलित समाजाने एकत्र येऊन केले होते. सवर्ण – दलित समाज कोणताही भेदभाव मानत नव्हते. पण नामांतराच्या आंदोलनामुळे गावातील वातावरण दूषित होते. अशातच गावातील हायस्कूलमध्ये रेखाटलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चित्राला कोणीतरी माथेफिरु शेण फासतो आणि दलित समाज पेटून उठतो. दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारुन सवर्णांची कामे नाकारली होती याचा राग सवर्णांच्या मनात अगोदरच होता परत या तणावामुळे दलित – सवर्ण संघर्षाची ठिणगी पडते. या घटनेचा प्रतिकार म्हणून गावकरी शाळा जमीनदोस्त करतात. शाळा मंदिरात भरविली जाते. दलितांना मंदिरात प्रवेश नाकारल्याने दलित मुले शाळेला कायमची मुकतात. उपेक्षितांच्या अंतरंगात असणारा चिवट झुंजपणा, प्रसंगी लढून मरण्याची चिवट आशा यांचे जीवनस्पर्शी चित्रण हा 'उपल्या'चा स्थूल विषय आहे.

'हिंदू' ही ग्रामीण राजकीय जीवनदर्शन घडविणारी, हिंदू धर्म आणि विषमतेचा चेहरा प्रकट करणारी कादंबरी आहे. ग्रामीण भागातील सवर्ण पुढारी भागात आपले वर्चस्व कायम रहावे म्हणून दलित–सवर्णांमध्ये सतत संघर्ष कसा पेटत राहील याची दक्षता घेतात. दलित समाजात बदल घडवू पाहणाऱ्या दलित समाजसेवकांना आपलीच शिकार बनवतात. तात्या कांबळे हा अचलपूरचा दलित समाजसेवक. त्याने बौद्ध धर्म स्वीकारुन गावकी

नाकारली. घरी परंपरागत तमासगिरीचा व्यवसाय असूनसुद्धा त्याने हा वसा आंबेडकरी जलशाच्या नव्या रूपात चालवला होता. तमाशा करुन छंदीफंदी लोकांची करमणूक करण्यापेक्षा आपल्या समाजातील अज्ञानी, अशिक्षित लोकांना स्वत:वर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करुन देत होता. जलशात आपल्याच गावातील मग्रूर पाटलाची भूमिका तात्या कांबळे वठवत होता कारण लोकांना कळावे की गावचा पाटील आपल्याला किती निचतेची वागणूक देतो. गावात शिवभजन ऐकायला येणारी मंडळी जलसा पहायला जात होती. याबरोबरच कोणत्या ना कोणत्या कारणांनी तात्या कांबळेविषयी गाववाल्यांच्या मनात असंतोष निर्माण होऊन याचे पर्यावसान त्याच्या खूनात होते. एका महाराच्या नावाने गाव ओळखावं याची खंत सवर्णांना होती. नाव असलेल्या आणि समाजसेवक असलेल्या दलिताचा खून करुन सर्वसामान्य जनतेला धडा शिकविण्याचा हा प्रयत्न होता. बौद्ध धर्मातील आणि दलित समाजातील परिवर्तनाची संवेदनशील आणि सामाजिक बांधीलकी स्वीकारलेल्या लेखकाने या कादंबरीमध्ये दलित - सवर्ण संघर्षाची नोंद घेतली आहे. कायद्याने घटनेनुसार आपण जातीयता दूर करु शकतो. परंतु मानवी मने, कितीही प्रयत्न केले तरी बदलता येत नाहीत. याची जाणीव शरणकुमार लिंबाळे या कादंबरीतून करुन देतात.

## ५.३ वाङ्मयीन मूल्यमापन :

वाङ्मय हे जीवनातील नानाविध सत्यातील सौंदर्य व्यक्त करत असते. कोणतेही वाङ्मय हे मानवाने मानवांकरिताच निर्माण केलेले असल्याने वाङ्मयातील सत्ये मानवी जीवनाशी अधिक संलग्न असतात. वाङ्मयातूनच जीवन व्यवहारातील अत्यंत व्यापक व सूक्ष्मातील सूक्ष्म अशी भावसत्ये, जीवनसत्वे, विचारसत्वे प्रगट झालेली असल्याने वाङ्मय हे श्रेष्ठ दर्जाचे ठरते यावरच वाङ्मयाची महात्मता अवलंबून असते.

वाङ्मयीन महात्मतेबाबत बा.सी. मर्ढेकर पुढील भाष्य करतात की, 'महात्मता ही मूल्यभावावर अवलंबून असते आणि मूल्यभाव म्हणजेच स्वानुभव क्षेत्रात संगती उत्पन्न करुन तिचा विश्वघटनांच्या वस्तूस्थितीदर्शक संगतीशी समन्वय लावणारे तत्व असे सांगून जितक्या

भावना सखोल, कणखर, तितकी संगतीची श्रेयस्करता अधिक असते.''[१] म्हणजे वाङ्मयीन मूल्यांचा शोध वाङ्मयाच्या आस्वादात व लेखकाच्या अनुभवातील प्रामाणिकपणात घ्यावा लागतो. वाङ्मयप्रकारात लेखकाची जीवनदृष्टी व निरीक्षणदृष्टि महत्वाची असते. या दोहोंच्या व्यापकतेवरच लेखकाच्या कलाकृतीचे यशअपयश अवलंबून असते. कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना कादंबरीच्या शीर्षकाची प्रतिकात्मकता, अर्पणपत्रिका, संवाद, भाषाशैली, वातावरण निर्मिती, वाक्प्रचारांचा वापर, कादंबरी लेखनाविषयी असणारी लेखकाची तटस्थवृत्ती या घटकांचा अभ्यास केला जातो. या दृष्टिकोनातून 'उपल्या' व 'हिंदू' या दोन कादंबऱ्यांचे मूल्यमापन पुढीलप्रमाणे केले आहे.

* **शीर्षकाची प्रतिकात्मकता :**

शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन करत असताना आपणास अंतर्भूत करायला लावणारी आणि विचार करायला लावणारी त्यांच्या कादंबऱ्याची शीर्षके आहेत. लिंबाळे यांच्या पहिल्या कादंबरीचे 'उपल्या' हे शीर्षक त्या कलाकृतीचे सौंदर्य वाढविण्यासाठी किंवा आकर्षणापोटी येत नसून या कादंबरी शीर्षकापाठीमागे त्यांच्या दु:खाचे व त्यांच्या अभिव्यक्तीचे अंग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीत अनेक बदल झाले. चळवळीचे नेतृत्व कोणी करायचे या अंतर्गत कलहाने चळवळ ग्रासली. चळवळीत अंतर्गत कलह निर्माण झाल्याने अनेक गट तयार झाले आणि तुझी चळवळ मोठी की माझी चळवळ मोठी हे प्रश्न ऐरणीवर आले. दलितांमध्ये दुफळी निर्माण झाल्याने चळवळी मोडीत निघून समाजही गटागटात विभागला गेला. वानरातील 'उपल्या' प्रमाणेच समाजातही संधीसाधू स्वार्थी कार्यकर्ते तयार होतात. आपणच चळवळीचे एकाधिकारशहा असावे. आपल्या भोगात दुसरा भागीदारी नको अशी उपल्याप्रमाणेच त्यांची दिसून येते.

डॉ. बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर १९५६ ते १९९६ या चार दशकाच्या काळात झालेले चळवळीतील फेरबदल दर्शवणारी ही कलाकृती आहे. कार्यकर्ता आणि लेखक

असा मेळ शरणकुमार लिंबाळे यांच्या व्यक्तित्वात असल्याने त्यांनी चळवळीत काम केले आहे व त्या जवळून अनुभवल्या असल्याने त्यांच्या कादंबरीचे 'उपल्या' हे शीर्षक सार्थ वाटते.

गावकुसाबाहेर जीवन जगणारा दलित समाज सवर्णांच्या अन्याय अत्याचाराला कंटाळून बौद्धधर्म स्वीकारण्यास तयार होतो पण सवर्णांना त्यांच्यातील परिवर्तन नको असते. दलितांनी आहे त्याच स्थितीत राहून आपली सेवाचाकरी करावी व आपण देईल ते त्यांनी धन्य मानावे अशी त्यांची भावना असते. जातीव्यवस्था हा समाजाला लागलेला कलंक आहे हा कलंक नष्ट झाल्याशिवाय देश सुंदर होणार नाही. हिंदू धर्मात विषमतेचा चेहरा दिसून येतो. जातीयतेचा कलंक किती काळाकुट्ट आहे. हे 'हिंदू' कादंबरीच्या शीर्षकातून व्यक्त होते.

कादंबरीला लेखक जे शीर्षक देतो ते त्या कादंबरीतील अशयाशी संबंधीत असल्याने शीर्षक हा जणू कथानकाचा अर्क असल्याचे जाणवते. म्हणून शरणकुमार लिंबाळे यांच्या 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्याची शीर्षके अर्थपूर्ण वाटतात. ही दोन्ही शीर्षके आशयाच्या व अर्थाच्या अनेक पातळीवरुन आल्याने ते अधिक समर्पक व प्रतिकात्मक वाटतात.

## * शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्यांच्या अर्पणपत्रिका :

शरणकुमार लिंबाळे यांच्या कांदबऱ्यांचे मूल्यमापन करताना कादंबरीच्या पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंतचा आशय महत्वाचा व वास्तव वाटतो. 'हिंदू' कादंबरीच्या प्रथम दर्शनी पानावर जी अर्पणपत्रिका आहे. ती त्यांच्या भावनाप्रधानतेचा आविष्कार म्हणावा लागेल. या अर्पणपत्रिका त्यांच्या मनोभूमीचे व वैचारिक जाणिवेचे सुस्पष्ट दर्शन घडवितात. त्याचबरोबर त्यांची निष्ठा व श्रद्धा व्यक्त करतात.

## * निवेदनपद्धती :

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मय प्रकार आहे. कोणतीही भाषिक कलाकृती निवेदनाशिवाय वाचनीय ठरत नाही. कादंबरीचा विस्तृत पट असल्याने तो भाषिक निवेदनाशिवाय मांडता येत नाही. कादंबरीत हे निवेदन कोणीतरी करत असते. कोणाच्या तरी दृष्टीतून, घडलेल्या घटनांचे, पात्रांचे, त्याच्या कृतींचे, पात्रांच्या स्वभावाचे चित्रण केले जाते. म्हणूनच निवेदन म्हणजे घटनांची मालिका.''[१०] असे म्हटले जाते. कादंबरीत व्यक्त होणाऱ्या अनुभवाची सगळी परिमाणे, निवेदनातूनच सूचित होतात. निवेदनाद्वारेच व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये ज्ञात होतात. निवेदन या घटकाबद्दल नंदा मेश्राम म्हणतात'' कादंबरीला एक विशिष्ट रूप देताना सर्व घटकांचा म्हणजे विशिष्ट स्वभावधर्माच्या व्यक्ती त्यांच्या कृती-उक्ती, घटना, प्रसंग, वातावरण इत्यादी तपशील पुरवण्यासाठी आणि विशिष्ट पद्धतीने त्यांची मांडणी करण्यासाठी कादंबरीकाराजवळ निवेदन हेच एक साधन आहे.''[११] म्हणजेच कादंबरीचा समग्र पट वाचकांसमोर उलगडण्यासाठी निवेदनाशिवाय दुसरा पर्याय नाही. निवेदनात सातत्य व सूत्र असावे लागते. कादंबरीच्या रचनेत कादंबरीद्वारा अभिव्यक्त होणाऱ्या अनुभवाची सगळी परिमाणे निवेदनातूनच सूचित होतात. "एखाद्या कादंबरीचे निवेदन म्हणजे प्रसंगाची मालिकाच असते तर बहुतांश कादंबऱ्यामध्ये वर्तमानात घडणाऱ्या घडामोडींचे कलानुक्रमी निवेदन असते.''[१२] कादंबरीच्या रचनेसाठी कादंबरीकाराने उपयोगात आणलेले निवेदन तंत्र नाविन्यपूर्ण आणि अर्थपूर्ण असू शकते.

कादंबरीचा निवेदक नेहमी कादंबरीकारच असतो असे नाही म्हणजे कादंबरीचे निवेदन कधी-कधी पात्रांच्या तोंडून केले जाते. प्रथमपुरुषी निवेदनपद्धती व तृतीय पुरुषी निवेदनपद्धती या दोन निवेदनाच्या पद्धती आहेत. प्रथम पुरुषी निवेदनात स्वत: निवेदक किंवा एखादे पात्र स्वत: होऊन निवेदन करते. नायक किंवा नायिका यांच्यापैकी कोणाला तरी केंद्रस्थानी कल्पून, त्याच्याभोवती कादंबरीतील लहानसहान प्रसंगांची गुंफण केली जाते. तृतीय पुरुषी निवेदक एकप्रकारे सर्वज्ञ आणि सर्वसाक्षी असतो. स्वत: लेखक त्रयस्थाची

भूमिका स्वीकारून सर्व प्रसंग स्वत: वर्णन करुन सांगतो. प्रथमपुरुषी निवेदनात निवेदकाच्या चिंतनाला व अंतर्मुखाला अधिक वाव असतो.

एखाद्या कादंबरीत पत्रे, रोजनिशी व इतर तपशिलाचे निवेदन ह्यांचा एकत्रितपणे उपयोग केलेला असतो. 'उपल्या' या कादंबरीचे निवेदन कथानकाला योग्य गती देते. 'उपल्या' कादंबरी चार भागात विभागली असल्याने यातील प्रत्येक नायक स्वत:हून निवेदन करतो. या कादंबरीसाठी प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा वापर करण्यात आला आहे. कथानकाला गती देण्यासाठी लेखक अनेक पात्रे व प्रसंगाचा वापर करतात. या कादंबरीच्या निवेदनासाठी पूर्वार्धात प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा वापर केलेला आहे. तर उत्तरार्धात रोजनिशीचा वापर केला आहे.

'हिंदू' कादंबरीच्या निवेदनासाठी लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी निवेदनाचा वापर केला आहे. 'हिंदू' ही कादंबरी दलित-सवर्ण संघर्षावर भर टाकणारी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलित समाजात होणारा बदल निवेदनाद्वारे लिंबाळेंनी नेमेकपणाने मांडला आहे. दलितांना स्वत:च्या हक्काची झालेली जाणीव व परिवर्तनवादी चळवळीचा व्यापक पट निवेदन तंत्राच्या अंगाने सहज सामावण्यात शरणकुमार लिंबाळेंना यश आले आहे.

* **संवाद :**

नाटक या वाङ्मय प्रकारात संवाद हे नाटकाचे मुख्यांग मानले जाते. त्याप्रमाणे कादंबरी वाङ्मयासाठी संवादाचे महत्व अनन्यसाधारण आहे. संवादामुळेच कादंबरीत नाट्य उत्पन्न होते. सर्वसामान्य वाचकाला आकर्षित करण्याचे सामर्थ्य संवादात असते. संवाद या संकल्पनेविषयी श्री. मा. कुलकर्णी म्हणतात, "संवादामधून अनेक घटना कळू शकतात. तसेच निरनिराळ्या पात्रांची विशिष्ट घटनेविषयीची प्रतिक्रियाही कळू शकते. पात्रांच्या मनांतील विचार - विकार, भाव-भावना इ. कळण्याचे संवाद हे एक उत्कृष्ट साधन आहे."[१३] म्हणजेच संवाद हीच खरी लेखकाच्या कलेची कसोटी असते. संवादाचा संबंध

एकीकडे कथानकाशी तर दुसरीकडे व्यक्ति दर्शनाशी आहे. पण त्यातल्यात्यात व्यक्तिदर्शनालाच जवळचा असा हा घटक आहे. म्हणून व्यक्तिदर्शनाच एक अत्यंत प्रभावी साधन असा संवादाचा उल्लेख करता येईल. चार्लस मार्गन यांच्या मते, ''कथानकाला गतिमान करणे, व्यक्तिदर्शन घडविणे आणि वातावरणनिर्मिती करणे अशी संवादाची तीन कार्य असतात.''[१४] कथानकाचा विकास करणे आणि स्वभावदर्शन घडविणे या दोन्ही गोष्टी कादंबरीकार संवादाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न करीत असते.

संवादाचा कथेशी निकटचा संबंध असल्याशिवाय कथेशी ते एकरूप होत नाहीत. संवाद हे संवादासारखे म्हणजे वास्तव व स्वाभाविक असणे गरजेचे असते. श्री.मा. कुलकर्णी कादंबरीतील संवादाचे महत्व पुढीलप्रमाणे विशद करतात. "लेखकाने पात्रांचे वर्णन करण्यापेक्षा त्याच्या मध्यस्तीशिवायच पात्रांच्या संवादातून त्यांच्याविषयीचे ज्ञान मिळविणे अधिक मनोरंजक असते. पात्रांच्या संवादामुळे सत्याचा आभास उत्पन्न होण्यासाठी मदत होते. अशा सर्व दृष्टीने संवादाचे महत्व विशेष आहे.''[१५] संवाद हे पात्रे व प्रसंग यांना अनुरूप तसेच भावभावनांनी व विकारांनी रंगलेले असावेत. तरच कादंबरीत चटकदारपणा येतो. लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी 'हिंदू' व 'उपल्या' या कादंबरीमधील संवादात आटोपशीरपणा व चटकदारपणाचा तंतोतंत वापर केला आहे.

सुरेखा माने व रामभाऊ कावळे यांमधील संवाद

'आमची माणसं कधी सोडवून आणणार' ?

'माझ्या हातात काय आहे'?

'लोकांना आत घालून निवांत बसलाय, पत्ते खेळत.'

'वाटेल ते बोलू नको'.

'बाहेर सगळं जग बोलतयं.'

'लोकांना वेड लागलंय'.

'सगळे लोक वेडे. तू तेवढा शहाणा'.

'मी गावचा पाटील आहे. तोंड सांभाळून बोल'.

'धरा गं, ह्याला ऽ पाटील हाय'.[१६]

वरील संवादातून लिंबाळेंनी सहज व स्वाभाविक भाषेचा वापर केल्याने सत्याचा आभास निर्माण होतो.

* **अनिरुद्ध आणि रविंद्र साने यामधील संवाद**

'साने, मला महत्वाचं बोलायचयं'.

'कशाबद्दल' ?

'पर्सनल आहे'.

'माझा दुसरा पिरिअड ऑफ आहे. तू रुमवर थांब. मी येतो, चर्चा करता येईल.'

'जरुर ये. वाट पाहतो.'

'निश्चित येणार'.[१७]

'उपल्या' कादंबरीतील या संवादामधून लिंबाळे यांनी गतिमानता. आटोपशीरपणा यांचा वापर केलेला आहे.

* **भाषाशैली :**

कोणत्याही साहित्यकृतीचा अभ्यास करताना भाषाशैलीदृष्ट्या अभ्यास हा अपरिहार्य असतो. कारण भाषेच्या माध्यमातून कादंबरीचा आशय अधिक परिणामकारक ठरतो. भाषेचा असा परिणाम साधण्यासाठी लेखक स्वत:ची अशी शैली निर्माण करतो. किंबहुना लेखक जे लिहितो त्यातून त्याची स्वत:ची अशी भाषाशैली अभिव्यक्त होत असते. म्हणूनच भाषा हे विचार व्यक्त करण्याचे साधन मानले जाते. विविध भाव-भावनांचे प्रकटीकरण करणे, आदान प्रदान करणे, व्यक्तिचे व्यक्तिमत्व साकार करणे इ. अनेक प्रकारचे कार्य

कादंबरीतील भाषा करत असते. भाषा ही जशी सामाजिक संस्था आहे तशीच ती वैयक्तिकही आहे. भाषेचा उपयोग समाजाला अनुसरुनच पण विशिष्ट रीतीने प्रत्येक व्यक्ति करीत असते. त्याचबरोबर भाषेतून विचारांचा वारसा पिढ्यानपिढ्या संक्रमित होऊन सांस्कृतिक भेद कळतात. संस्कृतीची व काळाची माहिती मिळते. ह्यादृष्टीने भाषाशैलीची व्याख्या भालचंद्र नेमाडे पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात. ''एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रूपामध्ये प्रकट करण्याकरिता वापरलेल्या तंत्रसमुच्चयाची पद्धती म्हणजे भाषाशैली.''[१८] कादंबरीचे निवेदन करण्यासाठी कादंबरीकाराला सर्वस्वी भाषेवरच अवलंबून राहावे लागते. "भाषाशैली म्हणून आपण ज्याचा विचार करतो ते म्हणजे भाषेतील सहजपण होय. लेखक जेव्हा सहज लिहितो असा प्रत्यय वाचकाला येतो तेव्हाच भाषेत शैली असल्याचे जाणवते.''[१९] कादंबरीकाराला लाभलेली विशिष्ट भाषेची वैशिष्ट्यपूर्ण घडण, लेखकाच्या काळात अस्तित्वात असणारे व्यावहारिक व भाषेचे स्वरूप, बालवयापासून लेखकांवर झालेले भाषेचे संस्कार, त्याची भाषाविषयक संवेदनशीलता, भाषेच्या वाङ्मयीन रूपासंबंधी त्याने केलेले परिशीलन या सर्व परिपाकातून लेखकाची भाषा घडत असते.

शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्यांची भाषाशैली अनुरूप अशा भाषेचाच प्रत्यय देते. त्यांच्या 'उपल्या' व 'हिंदू' या दोन्ही कादंबरीतील काही व्यक्तिरेखा ह्या ग्रामीण भागातून, तर काही मध्यमवर्गातून आणि विशिष्ट अशा सांस्कृतिक वातावरणातून आलेल्या आहेत त्यामुळे त्यांच्या वयानुसार, राहणीमानानुसार ही भाषा अवतरते. कादंबरीचा भाषिक अवकाश विस्तीर्ण असल्याने कादंबरीतील पात्रानुसार ग्रामीण बोलीभाषेचा किंवा प्रमाण भाषेचा वापर केला जातो. कादंबरीतील प्रसंग, निवेदन, संवाद यानुसार भाषा बदलत असते. दलित कादंबरीत भाषा हा महत्वाचा घटक असतो. कारण ज्या समाजातील कथानक कादंबरीकार रंगवतो त्या समाजातील भाषा स्वीकारणे हे वातावरण निर्मितीच्या दृष्टीने महत्वाचे असते. 'हिंदू' व 'उपल्या' कादंबरीमध्ये दलित कादंबरीचे अनेक गुणविशेष पहायला मिळतात. दोन्ही कादंबरीचे कथानक ग्रामीण भागातील असल्याने प्रत्येक

समाजानुसार भाषा बदलते. त्यामुळे ग्रामीण बोलीभाषेबरोबर प्रमाण भाषेची ही वैशिष्ट्ये लिंबाळे यांच्या कादंबरीतून दिसून येतात.

'यसेराला भाकर वाढा माय'. ऽऽ [२०]

'धरा गं ह्याला ऽ पाटील हाय'. [२१]

'म्या एवढं कष्टानं आणलेलं का कुत्र्यामांजराला घालू'?

लहानपणी तू किती आवडीनं खायाचास'! [२२]

वरील वाक्यातून ग्रामीण बोलीभाषेच्या वापराने कादंबरीला एक चांगले परिमाण लाभले आहे. लिंबाळे यांनी ग्रामीण बोलीभाषेबरोबरच प्रमाणभाषेचाही वापर आशयानुसार केल्याने पात्रांच्या तोंडी असणारे संवाद वास्तव वाटतात.

'रमा तू खरचं बुद्धिमान आहेस, तुझ्यामुळे मला दुसरी दृष्टी मिळाली. मी चळवळीतून आलो असलो तरी दुसऱ्या बाजूचा इतका व्यापक विचार कधी केला नव्हता. म्हणूनच की काय मी चळवळीबाहेर पडलो.' [२३]

दयानंद हा सुशिक्षित तरुण चळवळीत काम करणारा असल्याने त्याच्या तोंडी प्रमाणभाषेचा वापर केलेला दिसून येतो. लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी वापरलेली आशयानुरूप भाषा पात्रांचे स्वभाव, घटना, प्रसंग या सर्व गोष्टी अगदी सहजपणे वाचकांशी संवाद साधतात.

* **वातावरणनिर्मिती :**

कादंबरीच्या अभ्यासात कथानक, व्यक्तिरेखा, ह्या दोन प्रमुख घटकांच्याबरोबरच वातावरण किंवा स्थलकाल परिस्थिती ह्या घटकालादेखील अनन्य साधारण महत्व आहे. या घटकामुळे कादंबरीचे सौंदर्य वाढते. कादंबरीतील व्यक्तिरेखा स्थलकाल परिस्थितीशी म्हणजे वातावरणाशी निगडीत असतात. 'कादंबरीतील पात्रे कोठेतरी वावरत असतात त्यांच्याभोवती एक विविध वस्तूंनी भरलेले जग असते. त्यालाच आपण वातावरण किंवा

सेटिंग म्हणतो.''[२४] कादंबरीला लाभलेला नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक परिसर वातावरणाचेच घटक असतात. वातावरण ह्या घटकाबद्दल वा.ल. कुलकर्णी म्हणतात ''कोणत्याही विशिष्ट भूप्रदेशात विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर घटनाप्रसंग घडत असतात. हे स्थळकाळाचे उचित दर्शन घडविणे म्हणजेच पार्श्वभूमी किंवा वातावरण होय.''[२५] कादंबरीला सजीवता प्राप्त करुन देण्यात वातावरणनिर्मितीचा खूप मोठा वाटा असतो.

कादंबरीतील वातावरण निर्मिती ही व्यक्तिरेखा आणि त्यांची कृती यांच्याशी संबंधीत असते. वातावरण निर्मितीमुळे कादंबरीला सौंदर्य प्राप्त होते. तसेच तिच्यामुळे कथेतील घटना प्रसंग आणि व्यक्तिरेखांचे स्वभाव ह्यांच्यातील संबंध स्पष्ट होतो. "कादंबरीतील व्यक्तिंच्या आंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य वातावरणामध्ये असते. कादंबरीकार त्याच्या ह्या सामर्थ्याचा ज्यावेळी उपयोग करुन घेतो, त्यावेळी कादंबरीतील वातावरणाचे स्वरूप हे केवळ वर्णनात्मक पातळीवर राहत नाही तर कादंबरीच्या रचनेचा एक अविभाज्य दुवा बनते.''[२६] वातावरणाशी व्यक्तिरेखांच्या जीवनसरणीचा व त्यांच्या स्वभावाचा संबंध असतो. त्यामुळे व्यक्तिचित्रणाचाच वातावरण चित्रण हा एक भाग असतो. वातावरणाचे पात्रांशी व त्यांच्या कृतीशी जिवंत नाते असते. वातावरण निर्मितीतूनच पात्रांच्या मन:स्थितीवर प्रकाश पडू शकतो. याबाबत प्रा. बापट गोडबोले म्हणतात "चित्र कलेमध्ये पार्श्वभूमीचे जे कार्य तेच कादंबरीत वातावरणाचे आहे. चित्रातील पार्श्वभूमी प्रमाणे त्या चित्रातील देखाव्यास जसा एकप्रकारचा उठाव मिळतो, त्या चित्रचे विशिष्ट प्रसंगाचे मर्म कळण्यास मदत होते. तसेच कादंबरीतील वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यास फार उपकारक होते''.[२७] वातावरणामुळे व्यक्तिचित्रणाला आणि कथानकांतील प्रसंगाना अधिक उठावदारपणा येतो.

'हिंदू' कादंबरीतील तात्या कांबळेच्या प्रेतयात्रेचे वातावरण शरणकुमार लिंबाळे यांनी वास्तव व कसदार असे उभे केले आहे. तात्या कांबळे या दलित समाजसेवकाचा खून सवर्ण लोकांनी केल्यामुळे दलित समाजातील कार्यकर्ते पेटून उठतात. याचे चित्रण लिंबाळे

पुढीलप्रमाणे करतात. "प्रेतयात्रा शासकीय रुग्णालयाच्या बाहेर पडली. सुभाषचौकात माणिकचंद आणि गोपीचंद यांनी प्रेताला पुष्पहार अर्पण केला. आम्ही रोहिदासच्या मागून चाललो होतो. पंडित कानडे, कसबे गुरुजी, भीमा भोळे, चंद्रकांत आंभोरे, निकम मामा. साहेबाबरोबर होते. प्रा. राहूल बनसोडे, रमा बाबर, याकूब शेख, कबीर कांबळे ह्यांनी प्रेताचा कब्जाच घेतला होता. परिस्थितीला अचानक विपरित वळण लागलं. प्रेतयात्रा स्मशानभूमीकडे जाण्याऐवजी कलेक्टर कचेरीकडे वळली. पोलीसांनी रस्ता अडवण्याचा निष्फळ प्रयत्न केला. रस्त्यात सिटीबसवर दगडफेक झाली. कार्यकर्ते प्रक्षुब्ध झाले होते. त्यांना आवरणं कठीण झालं होतं. 'तात्या कांबळे अमर रहे' 'हमसे जो टकराएगा वह मिट्टीमें मिल जाएगा'. अशा घोषणांनी वातावरण दुमदुमलं होत. आजूबाजूच्या इमारतींनी कान बंद करुन घ्यावेत तशा खिडक्या बंद करुन घेतल्या होत्या. पटापट शटर्स बंद झाले होते. वातावरणात तणाव पसरला होता''.[२८] या घटनेतून दलित समाजाची एकता व माणूसकीची जाणीव होते.या वातावरणातून प्रेतयात्रेत निर्माण झालेल्या तणावाचे हुबेहुब वर्णन तपशिलासह लिंबाळे यांनी शब्दबद्ध केले आहे.

'उपल्या' कादंबरीतील दलितांच्या वेदना, विद्रोहाचे वातावरण लिंबाळे यांनी अचूकपणे शब्दबद्ध केले आहे. "पांगरीतल्या गावकऱ्यांनी दलितांना गाव बंद केलं होतं. काम बंद केल होतं. गेले अनेक दिवस दलितांचा छळ चालू होता. दलितांना कामासाठी शेजारच्या गावी जावं लागे. तेला – मिठासाठीही परगावी जाव लागे. पैसे देऊनही गावात धान्य मिळत नव्हतं. गावोगावी बहिष्काराची माहिती कळली होती. बाहेरगावीही दलितांना सूडाची वागणूक मिळत होती. गावात तर पाय ठेवायलाही जागा नव्हती. कुणी भीक वाढली तरी गावगुंड त्यांच्या घरी जाऊन दम देत होते. दलितांची नाकेबंदी झाली होती. गावातली तेढ वर्तमानपत्रापर्यंत पोहचली आणि त्याची बातमी झाली. दलितांनी गावकीची घाणेरडी काम सोडून दिली होती. त्यामुळे गावकरी चिडले होते. गावातील सफाईची काम कोण करणार ? मेलेली जनावर कोण ओढणार ? सवर्णांच्या घरातील लाकड कोण फोडणार ? सांगावा कोण नेणार ? गाववाल्याच्या घरी दारी कोण राहणार ? गावकऱ्यापुढ असंख्य प्रश्न

निर्माण झाले होते. गावकरी सूडाने पेटले होते. कारण काम करणारा महार नसेल तर त्याची बायको काम करायची. बायको नसेल तर त्याचा मुलगा काम करायचा. आज सर्वांनीच गावकीची काम नाकारली होती. हिंदू धर्म नाकारला होता. हिंदूच्या देव-देवता नाकारल्या होत्या. दलितांनी धर्मांतर केलं होतं. त्यांना नव आत्मभान मिळालं होतं. 'गावकी बंद तर गाव बंद' असा निर्णय गावपंचयतीनं एकमुखान घेतला होता. दलितांच्या पाणी पिण्याच्या विहिरीत रात्री कोणीतरी मेलेलं कुत्रं टाकलं होतं. दलितांनी पहाटेच पाणी भरलं होतं. सर्वजण सकाळी कामाला गेले होते. उजाडल्यावर लोकांना मेलेल कुत्रं दिसलं. गाववाल्यांनी रोज नव्या पद्धतीन छळ चालवला होता. दलितांनी संघर्ष करण्याच ठरवलं. गाव एक झाला होता. भीमनगरही एक झालं होतं. गावकऱ्यांना कायमची अद्दल घडविण्यासाठी दलित विद्यार्थी पांगरीला गेले. गावाला गराडा घातला. घराघरात घुसून. दिसेल त्याला मारहाण केली. गावकुसान हजारो वर्षात प्रथमच गावकऱ्यांचा आक्रोश ऐकला होता.''[२९] या वातावरणातून लिंबाळे यांनी दलितांनी केलेल्या विद्रोहाच्या प्रकटीकरणाचे वास्तव चित्रण केले आहे.

## * वाक्प्रचारांचा वापर :

मराठी साहित्यात नित्य नवे प्रवाह उदयास येऊन साहित्य समृद्धीस मदत करत असतात. त्यामुळेच वाङ्मयात चैतन्य निर्माण होते. लोकसाहित्यामुळे समाजातील संस्कृतीचा पिढीजात ठेवा सुरक्षित ठेवला होता. दलित कादंबरी जशी नव्या जाणिवेने आकारास आली त्याप्रमाणे दलित लेखक भाषेच्या वापराविषयीच्या संकल्पनांना फाटा देऊन बोलीभाषेद्वारेच वाक्प्रचारांचाच वापर आपल्या कादंबऱ्यातून करतात. म्हणूनच''[३०] 'वाक्प्रचार किंवा म्हणी हे लोकभाषेतील सौंदर्य आहे.' असे म्हटले जाते. या दोन्हींच्या आधारानेच लेखक मराठी भाषेला जिवंत ठेवू शकतात. प्रा. शरदचंद्र मुक्तीबोध म्हणतात, 'आम्ही आत्यंतिक व्यक्तिवादी लेखक होतो. आमच्या आविष्काराला अपुरी पडते म्हणून आम्ही भाषेची खूप मोडतोड केली. मोडतोडीमुळे भाषेचा जिवंतपणा कमी झाला. दलित

साहित्याने नेटिव्ह भाषेचा वापर केल्यामुळे भाषेला पुन्हा जिवंतपणा आला. जागृत भाषेचे सामर्थ्य दलित साहित्यात आहे. दलित साहित्याने बोलीभाषेचा सकसपणा पुन्हा मराठीत आणला.''[३१] म्हणी आणि वाक्प्रचारांतून दलित लेखक आपले अनुभव संदर्भ व्यक्त करतात.

लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी 'उपल्या' व 'हिंदू' या दोन्ही कादंबऱ्यात वाक्प्रचारांचा वापर करुन आशयाला समृद्धी आणली आहे. त्यांच्या कादंबऱ्यात पुढील वाक्प्रचारांचा वापर केलेला आहे.

नतमस्तक होणे, रक्तबंबाळ होणे, प्रतिकार करणे, भुईसपाट होणे, चेहरा पडणे, भंबेरी उडणे, कासावीस होणे, मन भरुन येणे, हातपाय गळाटणे, सतर्क राहणे, सुस्कारा सोडणे, धुमसत राहणे, गराडा घालणे, भारावून जाणे, उदास होणे, डोळ्यात प्राण आणणे, यासारख्या वाक्प्रचारांचा वापर करुन लिंबाळेंनी आशयात समृद्धता साधली आहे.

## * इंग्रजी शब्दांचा वापर :

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कादंबरी नव्या चैतन्याने, नव्या प्रेरणांनी समृद्ध झाल्याने आशयाची व्याप्ती वाढविण्यासाठी लेखक त्या-त्या प्रदेशानुसार व पात्रानुसार भाषा वापरत असतो. लेखक सामाजिक वास्तवातून लिहित असल्यामुळे मराठीबरोबरच इंग्रजी भाषेचा वापरही पात्रांच्या तोंडी करतो. त्यांनी कोणतीही कृत्रिम भाषा मिळवलेली नसते तर त्या समाजात राहून त्या समाजाचे वास्तव रूप लेखकाने न्याहाळले असल्याने कादंबरीत इंग्रजीचा वापर करतो. उदा : रुम पार्टनर, लास्ट इअर, स्विमिंग टँक, हॉस्टेल, स्टुडण्ट, प्रायव्हसी, गेस्ट, फेल, सलून, एन.सी.सी., पर्सनल, पीरिअड, बाथरुम, स्टार्ट, हाफ-हाफ, क्वार्टर्स, कंप्लेट, अपसेट, नॉन व्हेज, पी.एस.आय, कँटीन, सिव्हील, फॅन, बस-स्टँड, कर्फ्यू, मिनिस्टर, गेट, अटेंड, बॉडीगार्ड, लाईन, रेस्ट हाऊस, ट्रेन यासारख्या इंग्रजी शब्दांचा वापर 'उपल्या' व 'हिंदू' कादंबरीत आढळून येतो.

## * लेखकाची तटस्थवृत्ती :

लेखक शरणकुमार लिंबाळे यांच्या 'हिंदू' व 'उपल्या' या कादंबरी लेखनातून कुठेही उदात्तीकरण दिसत नाही. जे काय पाह्यलयं, अनुभवलयं त्याची ते तटस्थपणे चिकित्सा करतात. १९५६ ते १९९६ या चार दशकातील काळात समाजात घडलेल्या घडामोडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीत पडलेली फूट, व्यभिचाराकडे वळलेली राजरोस नैतिकता, वाढणारी बेकारी, दलितांवर होणारे अन्याय, अत्याचार, त्यांचे दारिद्र्य, दलित-सवर्ण संघर्ष, महगाई या जाणिवेची बीजे संपूर्ण कादंबरीभर दिसतात. इथे ज्या प्रकाराची, स्वरूपाची संवेदनशीलता आहे. भावनात्मकता आहे. ती 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यातून सिद्ध झाली आहे. एकूण जी काही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतरे आजूबाजूला घडतात त्याची स्पंदने नेमकेपणाने मांडण्यात लेखक यशस्वी झाला आहे. कादंबरीत आलेले छोटे-मोठे संवाद, घटना प्रसंग हे कादंबरीला अर्थपूर्णता आणणारे आहेत.

'उपल्या' व 'हिंदू' या कादंबरीची रचना कादंबरी आणि कथा यांच्या सीमेवरील रचना असल्याचे जाणवून येते. 'उपल्या' ही कादंबरी चार भागात विभागली आहे. प्रत्येक भागात नायक वेगळा आहे. घटना वेगळ्या आहेत. पण आशय मात्र जुळणारा आहे. कथानक मांडणीमध्ये प्रकरणे सलग नाहीत. यामुळे कथानकातील कार्यकारण संबंध तुटलेला दिसून येतो. चौथ्या भागामध्ये दैनंदिनीचा वापर केल्याने कादंबरीचा पूर्वाध आणि उत्तरार्ध वेगळे वाटतात. दलित चळवळीच्या नेत्यांना वास्तवाचे भान करून देणाऱ्या या कादंबऱ्या आहेत. पात्रानुसार स्थानिक बोलीभाषा, प्रमाणभाषा, व काही ठिकाणी इंग्रजी शब्दांचा वापर केल्याने निवेदनाच्या व संवादाच्या भाषेत परिणामकारकता आणली आहे. या कादंबरीच्या निमित्ताने दलित साहित्यातील विद्रोह, नकार माणूसकी, वैज्ञानिक दृष्टी, नवसमाज या पंचसूत्रीचा विचार पटवून द्यावयाचा प्रामाणिक प्रयत्न लेखकाने केला आहे. त्यामुळे एका वेगळ्या जीवनाचा अनुभव वाचकांना मिळतो.

**निष्कर्ष :**

१) 'उपल्या' व 'हिंदू' या कादंबऱ्यातून दलित-सवर्ण संघर्ष, दलित चळवळ यावर प्रकाश टाकलेला आहे. कलावंत आणि कार्यकर्ता असा मेळ शरणकुमार लिंबाळे यांच्या लेखनात असल्याने लेखकांमधील संवेदनशीलता व जागरुकता स्पष्ट होते.

२) 'उपल्या' या कादंबरीमध्ये लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी सद्यस्थितीमध्ये नव्या अंगाने दलितांना सवर्ण लोक कसे दाबून ठेवतात. त्यासाठी नव्या नव्या क्लृप्त्यांचे आयोजन कसे केले जाते, आजच्या वर्तमानातही दलित समाजाला अनेक प्रयासातून जावे लागते. या सगळ्या संकटांचे आणि त्यावर आजचा दलित समाज कशाप्रकारे मात करीत आहे याचे वास्तववादी चित्रण या दोन कादंबऱ्यातून केले आहे.

३) 'उपल्या' कादंबरीसाठी प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीचा वापर केलेला आहे. तसेच 'हिंदू' कादंबरीतील निवेदनासाठी प्रथम पुरुषी व तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर केलेला असून हे निवेदन देशातील सामाजिक राजकीय संदर्भांना टिपत जाते.

४) कादंबरीत संवादात्मकता साधलेली आहे. संवाद हे कादंबरीच्या गतिमानतेसाठी येतात. संवादासाठी वापरलेली भाषा प्रसंगानुसार बदलत गेल्याने कादंबऱ्यांची भाषा जिवंत व प्रभावी वाटते.

५) ब्राह्मणाचे दलितीकरण व दलित-सवर्ण संघर्ष गावपातळीवरच्या राजकारणातून उद्भवलेल्या आहे याचे दर्शन 'उपल्या' व 'हिंदू' या दोन कादंबऱ्यातून घडते.

६) वयपरत्वे, व्यवसायानुसार, समाजानुसार 'हिंदू' व 'उपल्या' या कादंबऱ्याच्या पात्रांच्या भाषेत फरक पडलेला दिसतो.

७) लिंबाळे यांच्या कादंबरीतील निवेदनाची भाषा ओघवती आहे. नेमक्या आणि अचूक शब्दांनी व लहान मोठ्या वाक्यांचा वापरामुळे निवेदन परिणामकारक ठरले आहे.

८) 'उपल्या' व 'हिंदू' कादंबरीतील वातावरणातून लिंबाळेंनी दलितांच्या वेदनेतून परिणामकारकता साधली आहे.

# संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १) | डोळस वसंत | दलित साहित्य प्रेरणा व स्वरूप, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती , १९९२ पृ. ७६. |
| २) | हातकणंगलेकर म.द. | संज्ञा संकल्पना कोश १९२० ते २००३ जी.आर. आर. भटकळ फाऊंडेशन, मुंबई, पहिली आवृत्ती डिसेंबर २००१ पृ. ६५३. |
| ३) | लिंबाळे शरणकुमार | 'हिंदू' दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १५ नोव्हे. २००३ पृ. ५२. |
| ४) | तत्रैव | पृ. ५२ |
| ५) | लिंबाळे शरणकुमार | 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १९९८ पृ. ८२. |
| ६) | तत्रैव | पृ. ९२ |
| ७) | तत्रैव | पृ. १७ |
| ८) | लिंबाळे शरणकुमार | 'हिंदू' दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००३ पृ. ५५. |
| ९) | (संपादक) डहाके वसंत आबाजी | मराठी वाङ्मयकोश १९२० ते २००३, जी.आर. भटकळ फाऊंडेशन मुंबई, पहिली आवृत्ती २००४, पृ. ६५३. |
| १०) | (संपादक) प्रभा गणोरकर, डहाके वसंत आबाजी | वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश जी.आर. भटकळ फाऊंडेशन मुंबई, पहिली आवृत्ती, डिसें. २००१, पृ. १७७. |
| ११) | मेश्राम नंदा | दलित कादंबरी : स्वरूप व समीक्षा डिंपल पब्लिकेशन आनंदनगर जि. ठाणे, प्रथमावृत्ती १६ डिसें. २००६. पृ. ३३,३४. |

| | | |
|---|---|---|
| १२) | (संपा) भागवत श्री.प. रसाळ सुधीर | साहित्य अध्यापन आणि प्रकार मौज पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती ५ एप्रिल १९८७ पृ. २७५ |
| १३) | कुलकर्णी श्री.मा. | कादंबरी रचना, उन्मेष प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती १९५६ पृ. ७१. |
| १४) | कुलकर्णी मदन | मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि विकास श्री मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती १९८४ पृ. ८ |
| १५) | कुलकर्णी श्री.मा. | कादंबरीची रचना उन्मेष प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती १९५६ पृ. ७२. |
| १६) | लिंबाळे शरणकुमार | 'हिंदू' दिलीपराज प्रकाशन, पुणे पृ. ६६. |
| १७) | लिंबाळे शरणकुमार | 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृ. १९-२०. |
| १८) | (संपा) नेमाडे भालचंद्र, हातकणंगलेकर म.द. | 'कादंबरी' वाङ्मयीन शैली आणि तंत्र, अभिजात प्रकाशन पुणे, १९८१ पृ. १३९. |
| १९) | ढगे सुशिला | मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००४ पृ. २०८. |
| २०) | लिंबाळे शरणकुमार | 'हिंदू' दिलीपराज प्रकाशन पुणे, पृ. ७०. |
| २१) | तत्रैव | पृ. ६६. |
| २२) | लिंबाळे शरणकुमार | 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन, पुणे पृ. ९२. |
| २३) | तत्रैव | पृ. ६७. |
| २४) | (संपा) प्रभा गणोरकर, डहाके वसंत आबाजी | वाङ्मयीन संज्ञा - संकल्पना कोश जी.आर. भटकळ फाऊंडेशन, पृ. १७६. |
| २५) | कुलकर्णी वा.ल. | जिवंत रेखीव कथा, आलोचना मुंबई, प्रथमावृत्ती, आक्टो. १९६७ पृ. ३४. |
| २६) | (संपा) भागवत श्री.पु. | साहित्य, अध्यापन आणि प्रकार पॉप्युलर, मौज प्रकाशन, मुंबई पृ. २७४. |

२७) बापट प्र.वा. गोडबोले ना.वा. — मराठी कादंबरी तंत्र आणि विकास व्हीनस प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती १९७३ पृ. १२९.

२८) लिंबाळे शरणकुमार — 'हिंदू' दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृ. ३६.

२९) लिंबाळे शरणकुमार — 'उपल्या' दिलीपराज प्रकाशन, पुणे, पृ. १६,१७.

३०) ढगे सुशिला — मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. ३१०.

३१) तत्रैव — पृ. ३१०.